I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 173 B.N.S.S)**

## प्रथम खबर अहवाल
**(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)**

1. **District (जिल्हा):** सातारा **P.S. (पोलीस ठाणे):** कराड शहर **Year (वर्ष):** 2025

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0945 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 21/08/2025 07:42 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** बुधवार **Date from (दिनांक पासून):** 20/08/2025 **Date To (दिनांक पर्यंत):** 20/08/2025

**Time Period (कालावधी):** प्रहर ६ **Time From (वेळेपासून):** 16:42 तास **Time To (वेळेपर्यंत):** 16:42 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 21/08/2025 **Time (वेळ):** 06:20 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 023 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 21/08/2025 07:42 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पश्चिम, 2 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** जिल्हा परिषद , बांधकाम उपविभाग कराड ताकराड,कराड

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

**6.** **Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

**(a)** **Name (नाव):** विशांत चंद्रकांत पवार

**(b)** **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

**(c)** **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1993 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e)** **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f)** **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g)** **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

**(h)** **Occupation (व्यवसाय):**

**(i)** **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मुधावडदरे पोकटकुण ता खटाव, वडुज , सातारा, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | मुधावडदरे पोकटकुण ता खटाव, वडुज , सातारा, महाराष्ट्र, भारत |

**(j)** **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-7972558585

**7.** **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रशांत आनंदा बावधनकर | | | 1. प्लट नं80,सार्वजनिक बांधकाम कर्मचारी,सहकारी गहनिर्माण,Town/Village (शहर / गाव): संस्था मर्यासोनगाव तर्फ सातार,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): कराड शहर,District (जिल्हा): सातारा,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 2 | शिवाजी बदु जाधव | | | 1. Town/Village (शहर / गाव): मसुर ता कराड,Tehsil (तहसील): कराड,Police Station (पोलीस ठाणे): कराड शहर,District (जिल्हा): सातारा,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

**8.** **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

**9.** **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**10.** **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

**11.** **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| **S. No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.)** |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

खबरी जबाब दिनांक 21/08/2025

मी विशांत चंद्रकांत पवार वय 32 वर्षे, व्यवसाय - सरकारी कॉन्ट्रॅक्टर, रा.मु.धावडदरे पो.कटकुण ता.खटाव जि.सातारा मोनं 7972558585

मी वरील ठिकाणी माझे कुटुंबियासमवेत वास्तव्यास असुन माझे शिक्षण बी.ई.सिव्हील असे झाले आहे. मी परवाना धारक सरकारी कॉन्ट्रॅक्टर आहे. मी जिल्हा परीषद, सातारा यांचेकडील बांधकाम विभाग, पाणी पुरवठा विभाग व लघुपाठबंधारे विभाग यांचेकडील सरकारी टेंडर मधून मिळणारे रस्ते, पाईपलाईन, बंधारे यांच्या बांधकामाची कामे घेतो.

मी दि. 20/08/2025 रोजी सकाळी 7.58 वा. अॅन्टी करप्शन ब्युरो, सातारा कार्यालयातील पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांना फोन करुन जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, कराड येथील शाखा अभियंता प्रशांत बावधनकर हे मी मौजे पार्ले ता.कराड येथील रस्त्याचे कामाचे मोजमाप करून बिल तयार करून मंजुरीसाठी पाठविणेकरिता 24,000/- रुपये लाचेची मागणी करीत असलेबाबतची थोडक्यात तक्रार सांगीतली व माझ्या तक्रारी नुसार कारवाई करावी अशी विनंती केली. तेव्हा पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांनी पोलीस निरीक्षक सुप्रिया गावडे ह्या माझ्या तक्रारीवर पुढील कारवाई कराड येथे येवुन करतील असे मला सांगुन त्यांचा मोबाईल नंबर दिला त्यानंतर मी सकाळी 8.10 वा पोलीस निरीक्षक गावडे मॅडम यांना संपर्क साधला.

तद्नंतर दिनांक 20/08/2025 रोजी माझ्या तक्रारीवरून पोलीस निरीक्षक गावडे मॅडम या दोन शासकीय पंच व सापळा पथकासह जलशुद्धीकरण केंद्र कराड येथे 11.45 वा. चे सुमारास हजर झाल्या. तेव्हा पोलीस निरीक्षक गावडे मॅडम यांनी माझी ओळख करून घेवून त्यांचे सह असणाऱ्या पंच 1) प्रणय मधुकर शेजवळ, अधिपरिचारक, सिव्हील हॉस्पीटल, सातारा 2) विकी समाधान कळंबे, अधिपरिचारक, सिव्हील हॉस्पीटल सातारा या दोन पंचांची व सापळा पथकातील पोहवा राजपुरे, चव्हाण, ताटे, पोशि देशमुख यांची एकमेकांना ओळख करून दिली. पोलीस निरीक्षक गावडे मॅडम यांनी मला माझे तक्रारीबाबत विचारणा केली असता मी त्यांना तक्रार सांगितली की, मी रा. धावडदरे पो-कटगुन ता.खटाव जि.सातारा येथील मुळचा रहिवाशी असुन सध्या रा. वर्धनगड ता.खटाव जि.सातारा येथे राहत आहे. माझे शिक्षण बी.ई.सिव्हील असे झाले असुन मला हिंदी, इंग्रजी, मराठी लिहता वाचता येते. माझ्याकडे सातारा जिल्हा परिषद, सातारा यांचेकडील सरकारी कॉन्ट्रॅक्टर परवाना असुन त्याचा नोंदणी क्रमाक 19/2023-2024 असा आहे. मला नोंदणीकृत परवाना हा 10 वर्षासाठी देण्यात आलेला आहे. मी जिल्हा परीषद, सातारा यांचेकडील बांधकाम विभाग, पाणी पुरवठा विभाग व लघुपाठबंधारे विभाग यांचेकडील सरकारी टेंडर मधून मिळणारे रस्ते, पाईपलाईन, बंधारे यांच्या बांधकामाची कामे घेतो.

मला दि.04/10/2024 रोजी पंचायत समिती कराड येथे झालेल्या कामवाटप समिती तथा कार्यकारी अभियंता, जि.प. बांधकाम विभाग, कराड यांचे मिटींग मध्ये मला बांधकाम उपविभाग, कराड यांचे अंतर्गत असले मौजे पार्ले ता.कराड जि.सातारा येथील रस्त्याचे कामाचे क्रॉक्रीटीकरण करण्याचे काम

मिळाले होते.

त्यानंतर मी सदर रस्त्याचे कामाचे क्रॉंक्रीटीकरण करणेसाठी उपअभियंता, जि.प. बांधकाम उपविभाग, कराड यांचे कार्यालयाशी संपर्क साधल्यानंतर मला दि. 18/02/2025 रोजी त्यांचेकडील जा.क्र.उविक/बांध/निविदा/2024 जि.प.बांधकाम. उपविभाग कराड दि.07/10/2024 अन्वये 4,07,082/- रुपयाची वर्क ऑर्डर मिळाली. त्या अनुषंगाने आवश्यक असलेली कागदपत्रे मी उपअभियंता, जि.प. बांधकाम उपविभाग, कराड यांचे कार्यालयात दिल्यानंतर कार्यालयातील शाखा अभियंता, दत्तात्रय भजनावळे यांनी मला कामाचे इस्टीमेट दिले. त्यांनी दि.05/03/2025 रोजी कामाच्या जागेची पाहणी करून मला काम सुरु करण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी दि.06/03/2025 रोजी सदर रस्त्याचे काम सुरु करुन दि. 08/03/2025 रोजी इस्टिमेटप्रमाणे काम पुर्ण केले.

त्यानंतर सदर रस्त्याचे काम पुर्ण झालेनंतर मी भजनावळे साहेब यांना माझे कामाचे बिलासंदर्भात त्यांचे कार्यालयात जावून भेटलो असता माझ्या कामाची फाईल ही प्रशांत बावधनकर, शाखा अभियंता यांचेकडे दिली असल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर त्यांचे सांगणेवरून मी माझ्या कामाच्या बिलाबाबत विचारणा करणेसाठी प्रशांत बावधनकर, शाखा अभियंता यांचेकडे गेलो असता त्यांनी मला ईस्टीमेटप्रमाणे काम झाले नसून अजुन 13 मीटर काम करण्यास सांगितले. म्हणून मी दि.29/07/2025 रोजी त्यांनी सांगितल्याप्रमाणे ज्यादाचे उर्वरित काम पुर्ण करुन दिले.

त्यानंतर दि.30/07/2025 रोजी शाखा अभियंता, प्रशांत बावधनकर यांनी मी केलेल्या रस्त्याच्या कामाची पाहणी करून काम पुर्ण झाले असल्याचे मला सांगितले. मी केलेल्या कामाच्या बिलाबाबत वारंवार प्रशांत बावधनकर यांची भेट घेवुन बिल काढणेबाबत विनंती केली परंतू त्यांनी माझे कामाचे बिल काढणेस टाळाटाळ केली.

मी दि.18/08/2025 रोजी मी प्रशांत बावधनगर, शाखा अभियंता, जि.प. बांधकाम उपविभाग, कराड यांना माझे कामाचे बिलासाठी फोन केला असता ते जिल्हा परिषद, सातारा येथे मिटींग करिता आल्याचे सांगितल्याने मी त्यांची जिल्हा परिषद, सातारा येथे भेट घेवून माझ्या प्रलंबित असलेल्या बिलाबाबत चर्चा केली असता त्यांनी मी पुर्ण केलेल्या 4,07,082/- रुपयाच्या इस्टीमेटमधील वर्क पोर्शनच्या कामाचे पाच टक्के प्रमाणे एकरकमी 20,000/- रुपये व कामाचा क्वॉलिटी कंट्रोल रिपोर्ट देणेसाठी 4,000/- रुपये असे एकूण 24,000/- रुपयाची मागणी केली. बावधनकर साहेब हे मागणी करीत असलेले 24,000/- रुपये त्यांना दिले नाहीत तर ते माझ्या कामाचे बील काढणार नाहीत याची मला खात्री झाल्याने त्यांना नाईलाजाने हो म्हणालो. त्यावेळी बावधनकर साहेब हे माझ्याकडे मागणी करीत असलेली रक्कम ही लाच रक्कम असल्याची माझी खात्री झाली.

तरी मी आज दिनांक 20/08/2025 रोजी प्रशांत बावधनगर, शाखा अभियंता यांची जि.प. बांधकाम उपविभाग, कराड या कार्यालयात जावून त्यांची समक्ष भेट माझ्या बिलासंदर्भाने तसेच त्यांनी मागणी केलेल्या लाच रकमेबाबत चर्चा करणार आहे. माझी बावधनकर साहेब यांना लाच रक्कम देण्याची मुळीच इच्छा नाही. तरी आपले विभागाकडुन त्यांचेवर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी ही विनंती. माझेत व प्रशांत बावधनकर, शाखा अभियंता यांचेत कोणतेही पुर्ववैमनस्य नाही व कोणतीही आर्थिक देवाणघेवाण नाही. तथा आमच्यामध्ये सदर कामाच्या व्यतिरीक्त कोणताही आर्थिक व्यवहार झालेला नाही. वगैरे मजकुराची माझे सहीची हस्ताक्षरातील तक्रार पोलीस निरीक्षक गावडे मॅडम यांना दिली असता त्यांनी व पंचांनी ती वाच्ून बघितली व त्यावर सहया केल्या. त्यानुसार पोलीस

निरीक्षक गावडे मॅडम यांनी प्रशांत बावधनकर, शाखा अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग,कराड यांचेकडे पडताळणी कामी पाठविण्याचा पंचांसमक्ष निर्णय घेतला. पंच नंबर 1 म्हणुन प्रणय शेजवळ व पंच नंबर 2 म्हणुन विकी कळंबे यांनी काम करण्याचे ठरविले. त्यानंतर पोलीस निरीक्षक गावडे मॅडम यांनी मला माझेकडे लाच मागणी होत आहे अगर कसे याबाबत पडताळणी करण्याचे ठरवुन पंचासमक्ष पडताळणी कारवाईची माहिती दिली व प्रक्रिया समजावून सांगितली. तसेच मला व पंचाना व्हॉईस रेकॉर्डरची माहीती देवुन पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने आवश्यक त्या सुचना दिल्या त्यानंतर 13.02 वाचे सुमारास व्हाईस रेकॉर्डर सुरू करुन माझे व पंचाचे निवेदन घेवुन माझे शर्टचे आतील बनियानला पीनच्या सहाय्याने व्हाईस रेकॉर्डर लावून दिले व जलशुद्धीकरण केंद्र, कराड येथुन पंच नंबर 1 प्रणय शेजवळ यांचेसोबत माझ्याकडील महींद्रा एक्सयुव्ही 700 चारचाकी वाहन क्रमांक एम एच 11 डी.जी. 9911 वरुन प्रशांत बावधनकर, शाखा अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, कराड येथे भेट घेण्याकरिता रवाना केले. त्यावेळी पोलीस निरीक्षक गावडे मॅडम व त्यांचे सहकारी जलशुद्धीकरण केंद्र कराड येथे थांबून राहिले.

मी व पंच नंबर 1 प्रणय शेजवळ असे जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, कराड ऑफिसमध्ये गेलो असता ऑफिसमध्ये माझी व बावधनकर साहेब हे कार्यालयात हजर नव्हते म्हणुन मी कार्यालयातील इसमास "बावधनकर साहेब आले नाहीत" असे विचारले असता त्याने "नाय" असे मला सांगीतले. त्यामुळे मी माझा मोबाईल फोन नंबर 7276360334 वरुन बावधनकर साहेब यांचा मोबाईल फोन नंबर 9823064124 वर फोन करुन लाउडस्पीकर ऑन केला व आलोय ऑफिसला असे सांगीतले तेव्हा बावधनकर साहेब यांनी मला आलोच अर्धा तास लागेल असे सांगीतले. त्यामुळे मी पंच नंबर 1 यांचे सोबत पुन्हा सापळा पथक थांबले ठिकाणी परत आलो तेव्हा गावडे मॅडम यांनी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर 13.14 वा. बंद केला.

त्यानंतर पुन्हा 13.56 वा. गावडे मॅडम यांनी व्हाईस रेकॉर्डर सुरू करुन माझे शर्टचे आतील बनियानला पीनच्या सहाय्याने लावून दिले व जलशुद्धीकरण केंद्र, कराड येथुन पंच नंबर 1 प्रणय शेजवळ यांचेसोबत माझ्याकडील चारचाकी वाहनातुन प्रशांत बावधनकर, शाखा अभियंता, यांची जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, कराड यांची भेट घेण्याकरिता रवाना केले. त्यावेळी पोलीस निरीक्षक गावडे मॅडम व त्यांचे सहकारी जलशुद्धीकरण केंद्र कराड येथे थांबून राहिले. त्यावेळी मी पंच नंबर 1 यांचे सोबत जावुन बावधनकर साहेब यांची त्यांचे कार्यालयात भेट घेतली त्यावेळी मी बावधनकर साहेब यांना नमस्ते भाऊसाहेब आता लोटांगण घालतो तुम्हांला म्हणंल भेटताय का नाय, भेटताय काय माहिती म्हणंल आज असे म्हणालो. तेव्हा ते असतंय बाबा काय पाहिजे आपल्याला, बस बस बस जरा, कुंठ आहे. असे म्हणाले. तेव्हा बावधनकर साहेब हे त्यांच्यासमोर असलेल्या लोकांसोबत बोलत होते म्हणुन मी पंचासह त्यांचे समोरच थाबुन राहीलो. तेव्हा बावधनकर साहेब मला विशांत विशांत असे म्हणाले तेव्हा मी बावधनकर साहेब बघा की जरा. असे म्हणालो त्यावर ते मला काल तुझं बील कच्च करुन ठेवलय. असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना म्हणंल परवा चर्चा झालीय तर परत काय नाय झाल अपडेट म्हणंल चेक करावं, आता ते रोडचे टोटल लेंथ घेतली आता त्या लेंथ मधी लास्ट जे राहिले होते ते पुर्ण केलेय. असे म्हणालो. म्हणालो तेव्हा माझ्यासोबत चर्चा करुन बावधनकर साहेब ते बघीतल की माप घेतलीत असे म्हणाले. तेव्हा तिथे शिवाजी जाधव हा

आला व तो बावधनकर साहेबांसोबत चर्चा करु लागला. तेव्हा कामाबाबत चर्चा करुन मी बावधनकर साहेब यांना एम व्टेंन्टी कॉन्टीटी, तस डायरेक्ट कॉन्टीटी घेतल्यात, नाय ते आपल बील किती होत आपल असे विचारले तेव्हा त्यांनी चार लाख तेवीस हजार पाचशे बारा असे मला सांगीतले. तेव्हा मी आणि त्यात जी एस टी ॲड होणार असे विचारले तेव्हा बावधनकर साहेब हा जी एस टी ॲड होणार असे म्हणाले. तेव्हा मी सत्तर हजार असे म्हणालो तेव्हा बावधनकर साहेब नाय बील बघून, चार लाख सात हजार बेऐंशी त्यात जी एस टी असे म्हणाले व माझ्या बिलाबाबत बावधनकर साहेबांशी चर्चा केली. तेव्हा बावधनकर साहेब यांनी शिवा कडे पाहुन शिवा यांना जरा मार्गदर्शन करा. असे सांगीतले. तेव्हा मी बावधनकर साहेबांना ओ सांगा की, असे म्हणालो तेव्हा ते जा असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना त्यांन सांगितल आणि तुम्ही सांगितल काय? असे म्हणालो. तेव्हा शिवा मला मी सांगतो असे म्हणाला तेव्हा मी त्यास काय किरकोळ हाय? पाच लाखाच किती रे, पाच लाखाच तर काम हाय असे सांगीतले. तेव्हा शिवा मला एस क्यु एम च म्हणतुय मी, काय द्याल? असे म्हणाला तेव्हा मी त्यास किती द्याल, तुम्ही सांगितल्या शिवाय मलातर, आता आमच्या जे जे एम ला एसक्युएम नाही. असे म्हणालो. तेव्हा शिवा मला तीन ते चार हा चार येत्याती, पाच किंवा सहा येत्याती कंडीशन आसती. असे म्हणाला. तेव्हा मी बावधनकर साहेब यांचेकडे पाहुन तुम्ही सांगा किती द्याच असे म्हणालो तेव्हा बावधनकर साहेब सांगितल की, असे म्हणाले तेव्हा मी त्यांना तीन हजार द्यायच. असे म्हणालो. तेव्हा बावधनकर साहेब चार असे म्हणाले तेव्हा मी त्यांना चार हजार असे म्हणालो असता ते दे दे आता, माझी कशी काम होत्यात, त्यांना माहीत आहे की, मला लय किड खाव पणा आवडत नाय. असे म्हणाले. तेव्हा मी बावधनकर साहेब यांचेशी कामाबाबत चर्चा करत असताना ये... हु... बाकीच काय? असे म्हणाले तेव्हा मी त्यांना
बाकीच तुम्ही सांगाल त्याप्रमाणे. असे म्हणालो असता बावधनकर साहेब यांनी पुन्हा शिवाकडे बोट दाखवुन याची गाठ घे असे सांगीतले. तेव्हा मी शिवा यास बोला की तुमी बोला हाय का? असे म्हणालो असता शिवा मला काय चार हजार रूपये देऊ टाका की, एस क्यु रिपोर्ट महत्वाचा, एस क्यु रिपोर्ट भेटतात की. असे म्हणाला तेव्हा मी त्यास पैसे द्यायला काय नाही. चार हजार रुपये काय अडचण हाय? बाकीच काय असल ती बोला की? असे म्हणालो असता त्याने मला पाच नी.. पाच नी असे सांगीतले. व देवुन टाका की साहेबाच असे म्हणाला. त्यानंतर मी बावधनकर साहेब यांचेशी चर्चा करुन त्यांना तास भर? असे म्हणुन पैसे घेवुन येण्याबाबत विचारणा केली असता त्यांनी आता वाजले दोन, अडीच साडे तीन चार पर्यंत फ्रेश होवून येतो. असे मला सांगीतले. तेव्हा मी चालतय म्हणुन तिथुन पंच नंबर 1 यांचे सोबत कार्यालयातुन बाहेर आलो व माझ्या चारचाकी वाहनातुन पुन्हा जलशुद्धीकरण केंद्र कराड येथे 14.37 वा.चे सुमारास परत आलो.

तेव्हा पोलीस निरीक्षक गावडे मॅडम यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून बंद केला. त्यानंतर त्यांनी विचारलेवरून मी घडलेली हकीकत सांगितली. तेव्हा पोनि गावडे मॅडम व पंचांनी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकून खात्री करून घेतली की, बावधनकर साहेब यांचे सांगणेवरुन शिवा जाधव याने  माझ्याकडे मी मौजे पार्ले ता.कराड जि.सातारा येथील रस्त्याचे कामाचे एकुण चार लाख बिलाचे पाच टक्के प्रमाणे एकरकमी 20,000/- रुपये लाचेची मागणी केली तसेच बावधनकर साहेब यांनी क्वॉलिटी कंट्रोल रिपोर्ट देण्याकरीता बेकायदेशीरपणे त्यांना अधिकार नसताना स्वत:साठी 4000/- रुपये लाचेची मागणी केली आहे. लाच मागणीवेळी पंच नंबर 1 प्रणय

शेजवळ हे माझ्यासोबतच होते. त्यांनी माझी व बावधनकर साहेब व शिवा जाधव यांचेत लाचमागणीची चर्चा समक्ष ऐकली आहे.

त्यानंतर पोलीस निरीक्षक गावडे मॅडम यांनी सापळा कारवाईचे नियोजन केले. त्यावेळी पोलीस निरीक्षक गावडे मॅडम यांनी मला व पंचांना अंथ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगीतले. त्यावेळी मी पोनि गावडे मॅडम यांचे सांगणेवरुन माझ्याकडे असलेली 24,000/- हजार रुपये लाचेची रक्कम म्हणुन पंचासमक्ष हजर केली. त्यानुसार पोलीस निरीक्षक गावडे मॅडम यांनी दिले सुचनेवरून सहकाऱ्यांनी मी हजर केलेल्या लाचेच्या रक्कमेच्या नोटांचे नंबर कोऱ्या कागदांवर लिहून घेतले. त्यावर पंचानी व गावडे मॅडम यांनी सही केली. त्यानुसार पोलीस निरीक्षक गावडे मॅडम व त्यांच्या सहकाऱ्यांनी पंचासमक्ष सापळापुर्व पंचनाम्याची कारवाई पुर्ण केली. त्यामध्ये मी हजर केलेल्या लाच रक्कमेच्या दोन्ही बाजूस पोलीस निरीक्षक गावडे मॅडम यांचे सुचनेवरून पोशि देशमुख यांनी अँथ्रासिन पावडर लावली व सदरची अँथ्रासिन पावडर लावलेली लाच रक्कम ही माझे पँटच्या पुढील उजव्या बाजूच्या खिशात ठेवून दिली व बावधनकर साहेब यांना लाच रक्कम दिल्या नंतर डावा हाताने डावा कान दोन वेळा ओढुन इशारा करण्याच्या सुचना पोलीस निरीक्षक गावडे मॅडम यांनी मला दिल्या. त्यानंतर पो.शि. देशमुख यांना सापळा पथकातुन वगळण्यात आले. तसेच पोनि गावडे मॅडम यांनी सापळा कारवाई यशस्वी झालेनंतर लोकसेवकाकडुन लाचेची रक्कम जप्त करणेचे चित्रीकरण पोहवा ताटे यांचे मोबाईल मध्ये करण्यात येणार असल्याचे सांगीतले.

त्यानंतर पोलीस निरीक्षक गावडे मॅडम यांनी पंचासमक्ष मला सापळा कारवाईच्या अनुषंगाने आवश्यक त्या सुचना देवुन 15.54 वा. व्हाईस रेकॉर्डर चालू करून माझे व पंचाचे निवेदन घेवुन, व्हाईस रेकॉर्डर माझे शर्टचे आतील बनियानला लावून मला पंच नं 1 यांचे सोबत जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, कराड कार्यालय येथे रवाना केले. आमचे पाठोपाठ पोलीस निरीक्षक गावडे मॅडम व पोहवा राजपुरे, चव्हाण, ताटे व पंच नंबर 2 हे शासकीय वाहन क्रमांक एम एच 11 डी एच 8216 मधुन आले. तेव्हा मी पंच नंबर 1 यांचे सोबत जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, कराड येथे गेलो तेव्हा बावधनकर साहेब व शिवा जाधव हे कार्यालयातच उपस्थित होते. तेव्हा बावधनकर साहेब मला ते दिलयं बघ रे बाबा, त्याच्याकडचं हाय ते बिल टायपिंगला करून घे ते, केलं का टायपिंग असे म्हणाले तेव्हा मी त्यांना रावसाहेब अं... असे म्हणालो तेव्हा ते मला हयाच्या पशी बस आन टायपिंग करून घे असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना टायपिंग करून घेवू का? असे विचारले असता त्यांनी हा. हयो लय बिझी माणूस हयं ऑफिसमध्ये असे म्हणाले तेव्हा मी कार्यालयातील अक्षय यास ये घे की अक्षय तेवढं बिल करून असे म्हणालो. तेव्हा अक्षय याने माझ्या बिलाचे टायपींग सुरु केले. त्यानंतर बावधनकर साहेब कार्यालयातील इतर लोकांसोबत चर्चा करत बसले तेव्हा मी पंच नंबर 1 यांचे सोबत कार्यालयातच थांबुन राहीलो. तेव्हा मी अक्षय याचे सोबत माझ्या बिलाचे कामाबाबत चर्चा केली. त्यानंतर मी बावधनकर साहेब यांना बावधनकर साहेब चार हजार हयाचे भरतो, रिपोर्टच आणि शिवानं पाच सांगितलेत त्यातल्या त्यात पाच टक्के जास्त होतात. असे म्हणालो. तेव्हा बावधनकर साहेब यांनी माझ्याकडे पाहुन उजव्या हाताचा अंगठा तर्जनीवर घासून लाच रक्कमेचा सुचक इशारा केला तेव्हा मी त्यांना आणलयं, नका लय टेंशन घेवू करतो पण थोडं फार कमी करा, घ्या थोडं फार कमी घ्या, लय नाय, चार आणि हे वीस हजार आणलेत, इस्टीमेट प्रमाणे ह्याच्या चार लाखाप्रमाणे. असे म्हणालो. त्यावर ते ठिक हाय असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना

ओके, सांगा की अक्षयला असे म्हणालो असता बावधनकर साहेब अरं अक्षयला भेट की तु जा की त्याच्यापशी, जावून बस की त्याच्यापशी पाचशे भोंगं असतात, ते नंतर बघू जावूदे नंतर बघू असे म्हणाले. त्यानंतर मी बावधनकर साहेब यांचेशी माझ्या कामाबाबत व इतर कामांच्या सदंर्भाने चर्चा केली तसेच मी अक्षय यास किती वेळ लागेल रे असे विचारले असता त्याने मला अर्धा पावून तास लागल असे सागीतले. त्यावेळी मी अक्षय यास अर्धा पावून तास नको पटदिशी होवून दे जावू दे बाबा, यल्लो पेजेस फक्त जोड हं, अक्षय यल्लो पेजेस, आर घे की तेवढं परत मला बाहेर झेरॉक्स मारायला जाव लागल, असे सांगीतले. त्यानंतर अक्षय आणि मी माझ्या बिलाबाबत चर्चा केली. तेव्हा बावधनकर यांना मी कांबळे साहेब, आल्याती परत आणखी डोक्याला ताप असे सांगीतले तेव्हा बावधनकर साहेब यांनी त्यांच केल नाय का? असे मला विचारले तेव्हा मी त्यांना नाय असे सांगीतले. तेव्हा त्यांनी मला का असे विचारले तेव्हा मी त्यांना पैस कुठ हैत, आता पैस आलं ते पण जमा झालेले, होल्ड पडलेला, 101 चा नो होल्ड आताशी निघाला, परत ती मागं लागतील असे सांगीतले. त्यानंतर तिथे भजनावळे साहेब उभे होते ते माझ्याशी माझ्या कामाबाबत चर्चा करु लागले. तेव्हा मी त्यांना काय म्हणताय असे विचारले तेव्हा ते मला चाललय बघ असे म्हणाले. तेव्हा मी अक्षय यास किती वेळ लागणार हाय असे विचारले असता त्याने मला थोडा वेळ असे सांगीतले. त्यानंतर मी बावधनकर साहेब यांचेजवळ जावुन थांबलो असता ते मला हाताने इशारा करुन बाहेर चल असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना दोन मिनीट, प्रोटोकोल राहीलाय, असे म्हणालो असता त्यांनी त्यांच्या टेबलचा ड्रॉवर उघडुन मला बोटाने इशारा करुन ठेव इथ असे म्हणुन लाच रक्कम ठेवणेबाबत इशारा केला तेव्हा मी माझ्याकडील लाच रक्कम बावधनकर यांचे टेबलचे उजव्या बाजुचे ड्रॉव्हरमध्ये ठेवली व बावधनकर यांना 24 आहेत असे म्हणालो. तेव्हा बावधनकर साहेब यांनी मान हलवुन होकार दिला. तेव्हा बावधनकर साहेब यांनी हाताने ड्रॉव्हरमधील पैसे पुढे सरकावुन ड्रॉव्हर बंद केला. तेव्हा मी व पंच नंबर 1 त्यांचे समोरच उभे होतो. सदरवेळी बावधनकर साहेब यांनी माझे कामाच्या एमबी बुक मध्ये एकुण रक्कम लिहुन स्वाक्षरी केली नसल्याने मी पंच नंबर 1 यांचेसोबत तेथेच थांबुन राहीलो. त्यानंतर मी बावधनकर साहेब यांचे सोबत कार्यालयाचे बाहेर चहा पिण्यास आलो. त्यावेळी पंच ही माझ्यासोबत आले. त्यानंतर आम्ही चहा पिवुन माघारी पुन्हा कार्यालयात आलो. तेव्हा बावधनकर साहेब त्यांचे आसनावर जावुन बसले तेव्हा मी अक्षय यास झाल का बिल तयार असे विचारले असता त्याने चाललय असे सांगीतले. त्यानंतर मी कार्यालयाचे बाहेरील मोकळ्या जागेत येवुन माझ्या डाव्या हाताने डावा कान दोन वेळा ओढुन सापळा पथकास दिसेल असा लाच रक्कम स्विकारलेचा पुर्वनियोजीत इशारा केला. तेव्हा पंच नंबर 1 हे बावधनकर साहेब यांचे टेबलजवळच थांबुन होते. त्यावेळी जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, कराड कार्यालयाचे इमारतीबाहेर आडोशास थांबलेले सापळा पथकातील पोहवा राजपुरे यांनी बावधनकर साहेब यांना त्यांचे कार्यालयात 16.57 वा चे सुमारास अटकावुन ठेवले. तेव्हा पोलीस निरीक्षक गावडे मॅडम यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद करून त्यांचे ताब्यात घेतला. त्यानंतर पोलीस निरीक्षक गावडे मॅडम यांनी प्रशांत बावधनकर यांना त्यांची ओळख सांगीतली. त्यांना त्यांचे नाव व पदाबाबत माहीती विचारली असता त्यांनी त्यांचे नाव प्रशांत आनंदा बावधनकर, वय 45 वर्षे, व्यवसाय नोकरी कनिष्ठ अभियंता वर्ग - 3,जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, कराड ता.कराड जि.सातारा असे असल्याचे सांगीतले. त्यानंतर पो.नि. गावडे मॅडम यांनी मला लाच रकमेबाबत विचारणा केली तेव्हा मी त्यांना

बावधनकर साहेब यांनी इशारा करुन सांगीतले प्रमाणे त्यांचे टेबलचे उजव्या ड्रॉव्हरमध्ये लाच रक्कम ठेवली असल्याचे सांगीतले त्यावेळी पोलीस निरीक्षक गावडे मॅडम यांचे सुचनेवरून पंच नंबर 2 यांनी टेबलचे ड्रॉव्हरमधुन 24,000/- रुपये लाच रक्कम काढून स्वत:चे ताब्यात घेतली. तसेच खाजगी इसम शिवाजी जाधव याचे याबाबत तक्रारदार यांना विचारणा केली असता त्यांनी कार्यालयातच उपस्थित असलेल्या इसमाकडे बोट दाखवुन ते शिवाजी जाधव असल्याचे सांगीतले. तेव्हा पोलीस निरीक्षक गावडे मॅडम यांचे सुचनेवरुन सापळा पथकातील पोहवा चव्हाण यांनी शिवाजी जाधव यास ताब्यात घेतले. त्यास त्याचे नाव पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव शिवाजी बदु जाधव व्यवसाय - कॉन्ट्रॅक्टर रा. मसुर ता.कराड जि.सातारा असे असल्याचे सांगीतले.

त्यानंतर पोलीस निरीक्षक गावडे मॅडम यांनी जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, कराड कार्यालयाचे लाईट व दारे खिडक्या बंद करुन कृत्रीम अंधार करुन त्यामध्ये अँथ्रासीन पावडर लागलेल्या नोटांची व माझ्या हातांची, तसेच लाच रक्कम ठेवलेल्या टेबलच्या उजव्या ड्रॉव्हरची अॅल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात निरीक्षण कारवाई केली. तेव्हा माझ्या हाताला तसेच प्रशांत बावधनकर यांचे हाताला व लाच रक्कम ठेवलेल्या टेबलच्या उजव्या ड्रॉव्हरला अंथ्रासीन पावडरची निळसर रंगाची चकाकी दिसुन आली. सदरवेळी पोहवा ताटे यांनी लोकसेवक यांचेकडुन लाच रक्कम ताब्यात घेतानाचे व्हिडीओ चित्रीकरण त्यांचे मोबाईल मध्ये केले आहे. त्यानंतर प्रशांत बावधनकर यांचेकडुन मी केलेल्या रस्त्याच्या कामाची कागदपत्रे पोलीस निरीक्षक गावडे मॅडम यांनी पंचासमक्ष जप्त केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक गावडे मॅडम यांनी सापळा पंचनाम्याची पुढील कारवाई शासकीय विश्रामगृह कराड येथे जावून करण्याचे निश्चित केले.

तरी दिनांक 20/08/2025 रोजी केले पडताळणी कारवाईवेळी लोकसेवक प्रशांत आनंदा बावधनकर, वय 45 वर्षे, व्यवसाय नोकरी कनिष्ठ अभियंता वर्ग - 3, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, कराड ता.कराड जि.सातारा यांनी वर्क ऑर्डरच्या कामाचे मोजमाप करणे व कॉलीटी कंट्रोल रिपोर्ट देण्याकरीता बेकायदेशीरपणे त्यांना अधिकार नसताना स्वत:साठी 4000/- रुपये लाचेची मागणी केली आहे. तसेच लोकसेवक प्रशांत बावधनकर यांचे सांगणेवरुन खाजगी इसम शिवाजी बदु जाधव रा.मसुर ता.कराड जि.सातारा यांनी लोकसेवक प्रशांत बावधनकर यांचेसाठी माझ्याकडे मौजे पार्ले ता.कराड जि.सातारा येथील केलेल्या रस्त्याचे कामाचे मोजमाप करुन बिल मंजुरीसाठी पाठविण्याकरीता एकुण 4,07,082/- रुपयाच्या इस्टीमेटमधील वर्क पोर्शनच्या कामाचे पाच टक्के प्रमाणे एकरकमी 20,000/- रुपये लाचेची मागणी केली. त्याचप्रमाणे दिनांक 20/08/2025 रोजी 16.42 वा चे सुमारास सापळा कारवाईवेळी लोकसेवक प्रशांत आनंदा बावधनकर यांनी माझ्याकडुन एकुण 24000/- रुपये लाच रक्कम जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, कराड कार्यालयामध्ये त्यांचे ऑफिसमधील टेबलचे उजव्या ड्रॉव्हरमध्ये ठेवण्यास सांगुन स्विकारली आहे. म्हणुन माझी त्या दोघांविरुद्ध कायदेशीर फिर्याद आहे.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** RAJU ANANDA TAHSILDAR (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):** **or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** RAJU ANANDA TAHSILDAR

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** PNMH50695

**14.** **Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15.** **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्‌दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्‍ या/पाहिलेल्‍ या) शारीरिक वैशिष्‍ टये, व्‍ यंग आणि इतर तपशील)**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्‍ मतारीख वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्‍ या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1980 | | - | | **चेचक:** क्र. |
| 2 | पुरुष | 1998 | | - | | **चेचक:** क्र. |

| Deformities / Peculiarities (व्‍ यंग वैशिष्‍ टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्‍ या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्‍ याच्‍ या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्‍ यापेक्षा अधिक तपशील दिल्‍ यास फक्‍ त यातील रकान्‍ यांची नोंद घेतली जाईल)**